इचलकरंजी नगरपरिषदेच्या इंदिरा गांधी मेमोरीयल हॉस्पिटलमधील कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांना सामावून घेण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदनि-२०१७/प्र.क्र.२८/ आरोग्य-४,
मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई-४०० ००१,
तारीख :- १२ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक:एमयुपी-२०१५/प्र.क्र.३१०/नवि-१९, दि.३०.०६.२०१६.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक:संकीर्ण-२०१५/प्र.क्र.९३/आरोग्य-४, दि.२.०८.२०१७.
३) शासन शुध्दीपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.९३/आरोग्य-४, दि.१२.१०.२०१७.
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : पदनि-२०१७/प्र.क्र.२८/आरोग्य-४, दि.१७.०१.२०१८.
५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : पदनि-२०१७/प्र.क्र.२८/आरोग्य-४, दि.१७.०२.२०१८.

प्रस्तावना:-

इचलकरंजी नगरपरिषदेचे इंदिरा गांधी मेमोरियल रुग्णालय सार्वजनिक आरोग्य विभागास हस्तांतरीत करण्याचा निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दि.२१.०६.२०१६ च्या बैठकीत घेण्यात आला होता. त्यास अनुसरुन त्याबाबतचा उपरोक्त दि.३०.०६.२०१६ च्या शासन निर्णयान्वये, सदरहू रुग्णालयातील वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील रुग्णालयात समावेशन करण्यास आणि वैद्यकीयेत्तर (Non-Medical Staff) कर्मचाऱ्यांना नगर परिषदेच्या सेवेत समाविष्ट होण्याचा विकल्प देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपरोक्त दि.०२.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयाकरीता पहिल्या टप्प्यात १५७ पदांच्या निर्मितीस आणि उपरोक्त दि. १७.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दुसऱ्या टप्प्यात नियमित ६३ पदे व काल्पनिक (कुशल) ८७ पदे निर्माण करण्यास आणि काल्पनिक (अकुशल) ५९ पदे भरण्यास मान्यता दिली आहे. तसेच, १४ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील रूग्णालयात समावेशन करण्याबाबत विकल्प दिलेल्या, सेवानिवृत्त आणि निधन पावलेल्या उर्वरित १४

अधिकारी / कर्मचारी यांना अधिसंख्य पदांवर व समकक्ष रिक्त पदांवर समावून घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णयः-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील रूग्णालयात समावेशन करण्याबाबत विकल्प दिलेल्या १० अधिकारी / कर्मचारी यांना खालील "तक्ता-अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून, सार्वजनिक आरोग्य विभागातील अन्य रुग्णालयामध्ये समकक्ष रिक्त पदांवर दि.१.४.२०१७ पासून पुर्वलक्षी प्रभावाने समावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, दि.१.०४.२०१७ ते दि.३०.०६.२०१७ या कालावधीत सेवानिवृत्त / निधन झालेले ४ कर्मचारी यांना खालील "तक्ता-ब" मध्ये दर्शविलेल्या कालावधीकरीता दि.१.४.२०१७ पासून पुर्वलक्षी प्रभावाने सामावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

"तक्ता - अ"

अ.क्र.	अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव	पदनाम	वेतनश्रेणी (रूपये)	ग्रेड पे (रूपये)	समावेशनाचा कालावधी
१	डॉ.गौरीप्रसाद शिवाजी वेताळ	वैद्यकीय अधिकारी	१५६००-३९१००	५४००	दि.१.०४.२०१७ पासून रिक्त पदावर समावेशन होईपर्यंत अधिसंख्य पदावर आणि त्यानंतर नियमित रिक्त पदावर.
२	डॉ.मारुती पांडुरंग भोई	वैद्यकीय अधिकारी	१५६००-३९१००	५४००	
३	डॉ.श्रीम. स्मिता धनंजय महाडिक (वैशाली सदाशिव पोरे)	वैद्यकीय अधिकारी	१५६००-३९१००	५४००	
४	डॉ.रविकांत रघुनाथ तेरवाडे	वैद्यकीय अधिकारी	१५६००-३९१००	५४००	
५	श्रीम. मनिषा संजय वडे (मनिषा शिवाजी सांळुखे)	सहायक परिचारीका प्रसाविका	५२००-२०२००	२४००	
६	श्री. सागर सुधाकर नागवेकर	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	
७	श्री. राहूल धोंडीराम नलवडे	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	
८	श्री. भारत बाळू सोळंकी	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	
९	श्री. सुभाष बाळू सोळंकी	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	
१०	श्री.अर्जून राजू चव्हाण	सफाईगार	४४४०-७४४०	१३००	

“तक्ता - ब”

अ. क्र.	अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव	पदनाम	वेतनश्रेणी (रूपये)	ग्रेड पे (रूपये)	समावेशनाचा कालावधी
१	२	३	४	५	६
१	श्री. प्रकाश तुकाराम जाधव	वैद्यकीय अधिकारी	१५६००-३९१००	६६००	दि.०१.०४.२०१७ ते दि.२६.०४.२०१७.
२	श्रीमती सविता शरद कोडोलीकर (जयश्री सुधाकर देशपांडे)	अधिपरिचारीका	९३००-३४८००	४२००	दि.०१.०४.२०१७ ते दि.३०.०६.२०१७.
३	श्रीमती स्नेहल सुभाष बोरीकर (मंदाकिनी मनोहर पत्की)	अधिपरिचारीका	९३००-३४८००	४२००	दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०५.२०१७
४	श्री. हिमांशू विष्णू मिरगे	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०५.२०१७

उपरोक्त “तक्ता-अ” मधील अधिकारी / कर्मचारी यांचे रिक्त पदावर समावेशन झाल्यानंतर, अधिसंख्य पदे व्यपगत होतील.

१) सदर एकूण १४ अधिकारी/कर्मचारी यांना दि.१.४.२०१७ पासून पुर्वलक्षी प्रभावाने शासन सेवेत प्रविष्ट झाल्याचे समजण्यात यावे.

२) उपरोक्त दिनांकापासून समावेशित कर्मचाऱ्यांचे शासनाच्या प्रचलित नियमानुसार भविष्य निर्वाह निधी, गट विमा योजना, व्यवसाय कर, आयकर व इतर वजाती करण्यात येईल.

३) समावेशनाच्या दिनांकास जे कर्मचारी सेवा प्रवेश नियमातील पूर्व निर्धारीत वयाची अट पूर्ण करीत नाहीत. त्यांना ही अट शिथिल करण्यात यावी.

४) समावेशीत कर्मचारीवृंदानी जात वैधता प्रमाणपत्र, मराठी / हिंदी भाषा परिक्षा, एम.एस.सी.आय.टी. चे प्रमाणपत्र, टंकलेखनाची अर्हता याबाबींची पूर्तता १ वर्षाच्या आत करण्याच्या अटीवर त्यांचे समावेशन करण्यात यावे.

५) ज्या कर्मचारीवृंदाना या पूर्वीपासून महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती) नियम १९८१ लागू आहेत. त्यांच्या मुळ नियुक्तीच्या दिनांकापासून त्यांच्या सेवा, सेवानिवृत्ती वेतन व अन्य सेवा विषयक लाभाकरिता गणण्यात यावी.

६) सदर कर्मचाऱ्यांना दि. १ नोव्हेंबर, २००५ व त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचारीवृंदाना अंशाकालीन सेवा निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात यावे.

७) गट-अ, गट-ब व गट-क मधील कार्यरत कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे इचलकरंजी, नगरपरिषद यांनी महालेखापाल, मुंबई यांचेकडे शिल्लकेसह हस्तांतरीत करण्यात यावेत.

८) शासनाच्या प्रचलित नियमानुसार गट-ड मधील कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे कार्यालयीन प्रमुख म्हणजे वैद्यकीय अधिक्षक यांचेकडे महानगरपालिका इचलकरंजी यांनी अंतिम शिल्लकेसह वर्ग करावेत.

९) सदरील समावेशित कर्मचाऱ्यांच्या सेवा त्या त्या संवर्गात शासन समावेशनाच्या (दि.१.४.२०१७) दिनांकापासून शून्य ज्येष्ठतेवर समाविष्ट करण्यात याव्यात.

१०) समावेशीत कर्मचारीवृंदाना यापूर्वीचा सेवा कालावधी हा शासनाच्या प्रचलित नियमानुसार रजा, आश्वासित प्रगती योजना व अन्य लाभाकरिता अनुज्ञेय समजण्यात यावा.

११) ज्या अधिकाऱ्यांचे / कर्मचाऱ्यांचे समावेशन करावयाचे आहे, त्यांच्या नियुक्त्या विहित मार्गाने जाहिरात देऊन, परीक्षा घेऊन / निवड समितीमार्फत निवड झालेल्या असाव्यात.

१२) संबंधीत अधिकारी /कर्मचारी त्या त्या पदाच्या विहित सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्तीसाठी पात्र ठरणे आवश्यक राहील.

१३) उपरोक्त अधिकारी/कर्मचारी शासनाच्या बदलीबाबतच्या प्रचलित नियमानुसार बदलीस पात्र राहतील.

२. उपरोक्त दि. १७.०१.२०१८ च्या शासन निर्णयानुसार आणि सदर शासन निर्णयानुसार जे अधिकारी / कर्मचारी त्या त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी बाबींची पूर्तता करतील त्यांच्या समावेशनासंबंधीचे नियुक्तीबाबतचे आदेश संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्याबाबत कार्यवाही करावी व त्याची प्रत शासनास सादर करावी. यापैकी गट-अ व गट-ब च्या अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतचे आदेश शासन मान्यतेने निर्गमित करण्यात यावे.

३. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी उपरोक्त “तक्ता-अ” मधील अधिकारी / कर्मचारी यांना अन्यत्र उपलब्ध असलेल्या रिक्त पदावर नियुक्ती देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.१५४/आपुक, दि.०३.०३.२०१८ अन्वये प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांचे सार्वजनिक आरोग्य विभागातील अन्य रूग्णालयातील समकक्ष रिक्त पदांवर समावेशन होईपर्यंतच्या कालावधीच्या वेतनावरील खर्च “मागणी क्र.आर-१, २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, (०६) - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०६) (०१) - मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रूग्णालये व दवाखाने (अनिवार्य) (२२१० ०२२६) या लेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ या वित्तिय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या निधी मधून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेताक २०१८०३०७१२५३१६४२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.03.12 17:25:42 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर,
आयुक्त, आरोग्य सेवा तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई,
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई,
सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे,
उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर,
जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर,
जिल्हा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर,
जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर,
मुख्याधिकारी, नगर परिषद इचलकरंजी, कोल्हापूर,
वित्त विभाग (व्यय-१३/ विनियम/वि.सु.-१/आ.पु.क.) मंत्रालय, मुंबई,
नगर विकास विभाग (नवि-१८), मंत्रालय, मुंबई,
सर्व सह सचिव / उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवडनस्ती (आरोग्य- ४).